दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -३३२ | मंगळवार,दि.०५ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-332 | Tuesday, Dt.05 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4







# ओबीसी आरक्षणासह नव्या प्रभागरचनेनुसार निवडणुका

## सर्वोच्च न्यायालयाचा आदेश, निवडणुकांचा मार्ग मोकळ

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

गेल्या अनेक दिवसांपासून प्रभागरचना आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. मात्र, यासंदर्भात आज सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला असून, नव्या प्रभागरचनेसह निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. राज्यातील महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका या नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मंजुरी दिली. त्यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे.

मधल्या काळात आधी कोरोना संकटामुळे निवडणुका रखडल्या. त्यानंतर ओबीसी आरक्षण आणि प्रभागरचनांच्या कारणास्तव निवडणुका लांबणीवर पडल्या. मात्र, एका याचिकेवर आज सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने महापालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद निवडणुका नव्या प्रभागरचनेनुसार करण्यास मंजुरी दिली.






# अष्टपैलू व्यक्तीमत्व शिक्षणमहर्षी मा.आ.श्री.भीमरावजी धोंडे साहेब !

आष्टी /प्रतिनिधी

तालुक्यातील रूई नालकोल येथे जन्मलेले मा. आ. श्री. भीमरावजी धोंडे साहेब यांनी नगरमध्ये महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण केले. सवंगडी सोबत घेऊन त्यांनी आष्टी तालुक्याच्या सामाजिक व राजकारणात प्रवेश केला. तत्कालीन प्रस्थापित मंडळींना विरोध करणे ही अत्यंत अवघड गोष्ट, तरीही त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेऊन विविध आंदोलने केली. नगर येथे शिक्षण घेत असतांना १९७५ साली नगर जिल्हा विद्यार्थी कृति समिती संघटनेच्या अध्यक्षपदी अविरोध निवड होऊन त्यांचे नेतृत्व उदयास आले.आज दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांचा वाढदिवस यानिमित्ताने राजेंद्र लाड यांनी घेतलेला त्यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा....

आष्टी, पाटोदा, शिरुर भागात मित्र मंडळींना सोबत घेऊन शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन दौरा केला. शेतकऱ्यांची बैठक घेऊन शेतकरी संघटीत करून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्याचे काम त्यांनी सुरू केले. त्यातून शेतकरी संघटना चळवळ उभी केली. या संघर्षशील नेतृत्वाची विधानसभेवर निवड झाली. तसेच तालुक्यातील प्रत्येक खेडेगावातील मुला - मुलींना शिक्षण मिळाले पाहिजे अशी तळमळ त्यांच्या मनात नेहमीच येत असल्याने त्यांनी १९८२ साली शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली आणि रूईनालकोल येथे पहिली शाळा सुरू केली. आपल्या गावात शाळा सुरू झाली परंतु आष्टी, पाटोदा, शिरुर तालुक्यातील मुलांना शिक्षण घेणे त्यावेळी अतिशय अवघड होते. हा भाग नेहमीच दुष्काळी राहिला असल्याने शिक्षणासाठी लागणारा पैसा अपुरा असल्याने मुलांना शिक्षण घेता येत नाही. ही परिस्थिती

पान २ वर..



शब्दांकन
राजेंद्र लाड (आष्टी)
मो.९४२३१७०८८५








# जिल्हा परिषदेचे कॅफो सुरेश केंद्रे यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा

## मुख्य लेखा व वित्त अधिकारी केंद्रे यांनी उल्लेखनीय कार्य केले- सीईओ जितीन रहमान

बीड दिनांक ३ (प्रतिनिधी):

जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश केंद्रे यांनी शासकीय ध्येय, धोरण आणि नियमानुसार काम करणारे आदर्शवत शिस्तप्रिय अधिकारी म्हणून त्यांनी कार्य केले, असे प्रतिपादन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले.

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश गंगाधर केंद्रे यांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा गुरुवार दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी आयोजित कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान बोलत होते.

याप्रसंगी रहमान आपल्या भाषणात बोलताना पुढे म्हणाले, कॅफो केंद्रे हे हसतमुख, सर्वांशी मिळून, मिसळून वागणारे मितभाषी कार्यक्षम अधिकारी. त्यांचे टीमवर्क आदर्श होते. त्यांनी मार्गदर्शकाच्या भूमिकेतून काम केले. आणि कार्यक्षम अधिकारी म्हणून ते सुपरीचीत आहेत. त्यांच्यासाठी एवढ्या उशिरापर्यंत मोठ्या संख्येने आपण सर्व उपस्थित आहात, हीच त्यांच्या कार्याची पावती आहे. यावेळी त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या योगदानाबद्दल सीईओ रहमान यांनी कौतुक केले.

सत्काराला उत्तर देताना कॅफे सुरेश केंद्रे यांनी, ३३ वर्षे विविध ठिकाणी सेवेतील उदाहरणे देऊन उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले.

सीईओ रहमान आणि मान्यवरांच्या हस्ते यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश केंद्रे व त्यांच्या सुविद्या पत्नी आशाताई या दांपत्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, जिल्हा कोषागार अधिकारी लहु गलगुंडे, शिक्षणाधिकारी (प्रा.) भगवान फुलारी, कार्यकारी अभियंता मोमिन सय्यद, कार्यकारी अभियंता विजय सपकाळे, जिल्हा पशुधन अधिकारी आर.डी. कदम, समाज कल्याण अधिकारी श्रीमती एस. एन. मेश्राम, कृषी अधिकारी सय्यद, जिल्हा जल संधारण अधिकारी सय्यद, सेवानिवृत्त कॅफे कुटे, आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ यांनी केले. यावेळी बोलतांना शिक्षणाधिकारी (प्रा.) भगवान फुलारी, लेखाधिकारी विकास ढोले, दिव्यांग संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अशोक आठवले, यांनी केंद्रे यांच्या कार्याविषयी गुणगौरव केला. याप्रसंगी कॅफो केंद्रे यांचे चिरंजीव इंजी. प्रशांत केंद्रे, डॉ. श्रीराम केंद्रे, सुन डॉ. सौ. प्रियांका, इंजि. सौ. प्रिया केंद्रे, लेखाधिकारी संजय नागरगोजे,



## संपादकीय

# अजेंडा फसला!

'दहशतवादाला कुठलाही धर्म नाही, कुठलाही रंग नाही', अशी टिप्पणी करत मालेगाव बॉम्बस्फोटप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेकडील खटल्यांसाठी निर्मिलेल्या विशेष न्यायालयाचे न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी गेल्या १७ वर्षांपासून सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या खटल्याचा निकाल दिला. माजी खासदार साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह सात आरोपींची त्यांनी निर्दोष मुक्तता केली. या निकालामुळे भारतीय सर्वसामान्य नागरिकांच्या मनावर 'हिंदू दहशतवाद' म्हणून जो शब्दप्रयोग बिंबविण्याचा प्रयत्न झाला होता, त्याला छेद मिळाला. बॉम्बस्फोट झाला होता, हे सरकारी पक्षाला सिद्ध करता आले असले, तरी केवळ संशयाच्या आधारे आरोपींना शिक्षा देणे योग्य नसल्याचे विशेष न्यायालयाने स्पष्ट केले. मालेगावातील मुस्लीमबहुल परिसरातील भिक्कू चौकाजवळील उभ्या असलेल्या मोटरसायकलमध्येच बॉम्बस्फोट झाला होता. त्यात सहा लोक ठार आणि शंभरहून अधिक जण जखमी झाले. २९ सप्टेंबर २००८ रोजी झालेल्या बॉम्बस्फोटाचे पडसाद देशभर उमटले. सुरुवातीला तपास करत एटीएसने साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल पुरोहित यांना संशयित म्हणून अटक केली. हिंदूही बॉम्बस्फोट घडवू शकतात. मुंबईसह महाराष्ट्रात झालेल्या बॉम्बस्फोटाच्या घटनांना उत्तर म्हणून 'हिंदू राईट विंग'कडून मालेगावचा बॉम्बस्फोट घडविण्यात आला, अशी पोलीस तपासातील सूत्रांची माहिती त्यावेळच्या माध्यमांच्या हेडलाईन बनल्या होत्या. तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी 'हिंदू दहशतवाद' हा शब्दप्रयोग केल्याने, मालेगाव बॉम्बस्फोट खटल्याकडे धर्माच्या चष्म्यातून पाहिले गेले. २०११ साली एनआयएने या प्रकरणी हस्तक्षेप करून पुन्हा नव्याने तपास सुरू केला. २०१६ मध्ये महाराष्ट्र एटीएसने केलेल्या काही आरोपांना नाकारून खटल्यातील काही आरोपींची एनआयएने सुटका केली. मात्र, दहशतवाद विरोधी कायदा (यूएपीए) आणि आयपीएस अंतर्गत गंभीर आरोप कायम ठेवले. एक लाखांहून अधिक पानांचे पुरावे, ३०० साक्षीदारांची साक्ष नोंदवून विशेष न्यायालयाने गुरुवारी निकाल दिला.

# ई-पीक पाहणीसाठी पिकांची १४ सप्टेंबर पर्यंत डिजिटल नोंद करणे शेतकऱ्यांना आवश्यक - तहसीलदार सुरेखा स्वामी

धर्माबाद, /अशोक पडोळे

राज्य शासनाच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या ई-पीक पाहणी प्रकल्पाची खरीप हंगाम २०२५ साठीची अंमलबजावणी १ ऑगस्ट पासून सुरू झाली आहे. धर्माबाद तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी मोबाईल प (व्हर्जन ४.०.०) च्या सहाय्याने आपल्या ७/१२ उताऱ्यावर नमूद शेतजमिनीवरील खरीप पिकांची डिजिटल नोंद १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर या कालावधीत करणे आवश्यक आहे.



ई पीक पाहणी प्रकल्पाची खरीप हंगाम २०२५ साठीची अंमलबजावणी १ ऑगस्टपासून सुरू झाली आहे. धर्माबाद तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी प्रक्रियेचा लाभ घ्यावा. असे आवाहन तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी केले आहे.शासकीय नियमानुसार ही पाहणी १४ सप्टेंबर २०२५ पूर्वी पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी डीसीएस मोबाईल प (व्हर्जन ४.०.०) च्या सहाय्याने आपल्या ७/१२ उताऱ्यावर नमूद शेतजमिनीवरील खरीप पिकांची डिजिटल नोंद १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर या कालावधीत करणे आवश्यक आहे. पीक पाहणी करताना अडचण आल्यास, आपल्या गावासाठी नियुक्त पीक पाहणी सहाय्यकांची तसेच महसूल सेवक व ग्राम महसूल अधिकारी यांची मदत घ्यावी, असे तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी सांगितले.

पीक पाहणीचे मुख्य फायदे...

शेतकऱ्यांना अत्यंत महत्त्वाच्या योजना (पीक विमा, नैसर्गिक आपत्तीमधून नुकसान भरपाई, अनुदान वितरण इत्यादी) यांचा लाभ मिळण्यासाठी पीक पाहणी आवश्यक आहे. पीक उत्पादनाचा अचूक अंदाज, कृषी धोरणांचे नियोजन, पुरवठा साखळी व्यवस्थापन आदी बाबींसाठी उपयुक्त ठरते. शेतीविषयक योजनांमध्ये पारदर्शकता आणि वेगवान कार्यवाही सुनिश्चित होते. शेतकऱ्यांना स्वतःच्या मोबाईलवरून पीक नोंद करता येते, यामुळे वेळेची बचत आणि नियंत्रण राहते.

सहायक स्तरावरील पीक पाहणी ही १५ सप्टेंबर ते २९ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान राबविण्यात येणार आहे. मात्र, शेतकऱ्यांनी शक्य तितकी नोंद स्वतःच पूर्ण करून स्वावलंबी शेतकरी हा आदर्श प्रस्थापित करावा.- सुरेखा स्वामी, तहसीलदार, धर्माबाद.

पान १ वरून..

# अष्टपैलू व्यक्तीमत्व ....

शिक्षणमहर्षी मा. आ. श्री. भीमरावजी धोंडे साहेब यांनी पाहिली आणि शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शाखा गावागावांत सुरू केल्या. यामध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यामिक, पदवी तसेच बीपीएड कॉलेज, बी. एड., पदवी महाविद्यालये, डी. एड. कॉलेज, कृषि विद्यालय, बी. एस्सी अँग्री, बी. ए. एम. एस. असे सर्व प्रकारचे शिक्षणअष्टपैलू व्यक्तीमत्व - शिक्षणमहर्षी मा.आ.श्री.भीमरावजी धोंडे साहेब.

आष्टी तालुक्यातील रूई नालकोल येथे जन्मलेले मा. आ. श्री. भीमरावजी धोंडे साहेब यांनी नगरमध्ये महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण केले. सवंगडी सोबत घेऊन त्यांनी आष्टी तालुक्याच्या सामाजिक व राजकारणात प्रवेश केला. तत्कालीन प्रस्थापित मंडळींना विरोध करणे ही अत्यंत अवघड गोष्ट, तरीही त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेऊन विविध आंदोलने केली. नगर येथे शिक्षण घेत असतांना १९७५ साली नगर जिल्हा विद्यार्थी कृति समिती संघटनेच्या अध्यक्षपदी अविरोध निवड होऊन त्यांचे नेतृत्व उदयास आले. आज दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांचा वाढदिवस. त्यानिमित्ताने राजेंद्र लाड यांनी घेतलेला त्यांच्या कार्याचा आढावा....

आष्टी, पाटोदा, शिरुर भागात मित्र मंडळींना सोबत घेऊन शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन दौरा केला. शेतकऱ्यांची बैठक घेऊन शेतकरी संघटीत करून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्याचे काम त्यांनी सुरू केले. त्यातून शेतकरी संघटना चळवळ उभी केली. या संघर्षशील नेतृत्वाची विधानसभेवर निवड झाली. तसेच तालुक्यातील प्रत्येक खेडेगावातील मुला - मुलींना शिक्षण मिळाले पाहिजे अशी तळमळ त्यांच्या मनात नेहमीच येत असल्याने त्यांनी १९८२ साली शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली आणि रूईनालकोल येथे पहिली शाळा सुरू केली. आपल्या गावात शाळा सुरू झाली परंतु आष्टी, पाटोदा, शिरुर तालुक्यातील मुलांना शिक्षण घेणे त्यावेळी अतिशय अवघड होते. हा भाग नेहमीच दुष्काळी राहिला असल्याने शिक्षणासाठी लागणारा पैसा अपुरा असल्याने मुलांना शिक्षण घेता येत नाही. ही परिस्थिती शिक्षणमहर्षी मा. आ. श्री. भीमरावजी धोंडे साहेब यांनी पाहिली आणि शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शाखा गावागावांत सुरू केल्या. यामध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यामिक, पदवी तसेच बीपीएड कॉलेज, बी. एड., पदवी महाविद्यालये, डी. एड. कॉलेज, कृषि विद्यालय, बी. एस्सी अँग्री, बी. ए. एम. एस. असे सर्व प्रकारचे शिक्षण सुरू केले. शिक्षकांसाठी पतसंस्था सुरू केली. अनेक शिक्षण संस्था आष्टी, पाटोदा, शिरुर तालुक्यात सुरू केलेल्या आहेत. या संस्थामध्ये संपुर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी आष्टीमध्ये येतात. आष्टी तालुका शिक्षण क्षेत्रात बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर असला पाहिजे याचे श्रेय फक्त मा. आ. श्री. भीमरावजी धोंडे साहेब यांनाच आहे.आष्टी विधानसभा मतदार संघाचे तालुक्याचे सलग पंधरा वर्ष आमदार राहीले व पुन्हा २०१४ मध्ये निवडून आले. त्यांनी १९८० ते १९९५ या कालावधीमध्ये मोठी विकासकामे केली. नंतरच्या निवडणुकीत त्यांना अपयश आले असले तरी त्यांनी सामाजिक कार्यामध्ये कसलाही बदल केला नाही. त्यांनी आमदार असतांना प्रत्येक गावाला जाण्यासाठी रस्ता, तलाव, नळ योजना, विजेची सोय, शाळा, मंदिरे आदी विकासाची कामे केलेली आहेत. आजही ते तितक्याच जिद्दीने व धाडसाने शेतकऱ्यांचे व सर्वसामान्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी उभे रहात आहेत.

आष्टी तालुक्याला कुकडीचे पाणी मिळावे म्हणून आष्टी ते मुंबई पायी मोर्चा तसेच शेतकऱ्यांसाठी आष्टी ते दिल्ली पायी मोर्चा काढला. मा. आ. श्री. भीमरावजी धोंडे साहेब यांना सलग तीन वेळा निवडणुकीमध्ये अपयश आले तरी, आजपर्यंतचा मागील इतिहास पाहिला तर राजकारणात धोंडे साहेब हे कायम चर्चेत राहून समाजसेवेचे व्रत त्यांनी सोडले नाही. त्याची पावती म्हणून मतदारांनी पुन्हा २०१४ साली विधानसभेवर पाठवले. पुन्हा त्यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघाच्या विकासाला चालना मिळालेली आहे. आष्टी मतदार संघ हा सातत्याने दुष्काळाच्या सावटाखाली आहे. २००१ पासून या मतदारसंघातील पाऊस ६० टक्याच्या पुढे गेलेला नाही. त्यामुळे नुसत्याच शेतीवर भागत नाही म्हणून स्थलांतर होत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढतात, त्यालाही कारण सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा हेच आहे. त्यामुळे मतदार संघाला खात्रीशीर हक्काचे आणि कायमस्वरूपी पाणी आणणे हेच आपले ध्येय आहे आणि पुढचे राजकारण त्यासाठीच असल्याचे मा. आ. श्री. भीमराव धोंडे साहेब म्हणतात. पुर्वी सरकारचे बजेट कमी असायचे मात्र सरकारमध्ये आणि लोकप्रतिनिधींमध्ये संवेदनशिलता होती, एखादी घटना घडली किंवा एखादा प्रश्न उपस्थित केला गेला तर संपुर्ण सभागृह प्रतिसाद द्यायचे, त्यावर चर्चा व्हायच्या, मात्र दुर्दैवाने आता तितकीशी संवेदनशिलता राजकारणामध्ये राहिलेली नाही. असे मा. आ. श्री. धोंडे साहेब सांगतात.शेती हा महाराष्ट्राचा कणा आहे, मात्र शेतीकडे पहिल्यापासूनच सरकारने फारसे लक्ष दिलेले नाही. आजही त्या भागात सिंचनाच्या सुविधा नाहीत. १९८० पासून सोयी आणि सुविधा अपुऱ्या आहेत. आजपर्यंत खरे तर कृष्णा खोऱ्याचे पाणी आष्टी भागात यायला हवे होते. मात्र ते आलेले नाही आणि सिंचनाशिवाय प्रगती होत नाही हे वास्तव आहे. एकदा शेतकऱ्यांना खात्रीशिर पाणी मिळाले की तो प्रगती करू शकतो म्हणूनच सरकारने सिंचनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. असे धोंडे साहेबांना नेहमीच वाटते. शेतकरी उपाशी आहे, त्याच्या पोटाला अन्न आणि हाताला काम देणे हे महत्वाचे आहे. त्याला इतर गोष्टींचा काय उपयोग आणि यासाठी पाणी गरजेचे आहे. ज्या भागात पाणी आहे तेथे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत नाहीत. शेतकरी आत्महत्येकडे निव्वळ एक प्रकरण म्हणून पाहून चालणार नाही. एकेकाळी कधीतरी एखादी आत्महत्या झाली तर संपुर्ण सभागृह गंभीर व्हायचे आता राज्यात रोज चार आत्महत्या होत आहेत. शेतीसाठीची धोरणे बदलावी लागणार आहेत. असे धोंडे साहेबांचे मत आहे.

जर आरनाल्डो नावाचा नट वयाच्या ७५ व्या वर्षी हॉलीवूडमध्ये नायक म्हणून काम करू शकतो तर धोंडे साहेबांना काय अडचण आहे. मुळात लहानपणापासूनच धोंडे साहेबांवर व्यायामाचे संस्कार आहेत. ४ थीला असतांना त्यांची आई त्यांना सोडून गेली, मात्र आजोबा, वडिल, काका पहाटेच व्यायामाला न्यायचे. त्यांची मुलंही आजही व्यायाम करतात, खेळतात. या व्यायामाचा आणि खेळाचा एकंदरच परिणाम धोंडे साहेबांच्या शरीरावर झाला. तसेच त्यांनी ते सातत्य आजपर्यंत टिकदून ठेवलेले आहे. खेळ हा तर त्यांच्या आवडीच विषय आहे, जर धोंडे साहेब आजपर्यंत खेळत राहिलो असते तर प्रो कबड्डीमध्ये त्यांची किंमत कोटयावधीमध्ये झाली असती. महाविद्यालयीन जीवनापासून ते सातत्याने खेळत आलेले आहेत. कुस्ती, कबडी, अँथलेट आदी प्रकारामध्ये ते पुणे विद्यापीठाच्या संघात कायम असायचे. त्यामुळे वर्षातले तीन चार महिने ते पुण्यातच असायचे. खेळत असतांनाच विद्यालयीन जीवनातच १० टक्के भारत देश त्यांनी पाहिला आणि यातूनच एक खिलाडू वृत्ती त्यांनी आयुष्यात जोपासली, ज्याचा त्यांना आजही उपयोग होतो. तसा राजकारण हा विषय त्यांचा नव्हता पण त्यांच्याबददल प्रत्येकाला आकर्षण असायचे. सत्तेत असतांना आणि नसतानांही ते जेथे कोठे जातात तेथे लोक जमतात. हे केवळ आजचे नाही तर महाविद्यालयीन जीवनातही तेच चित्र असायचे. ते कॉलेजला असतांना त्यांच्याभोवती विद्यार्थ्यांचा घोळका कायम असायचा. कबड्डी आणि कुस्तीमध्ये ते त्यावेळी सर्वपरिचीत होते. त्यानंतर कुस्ती आणि कबड्डीमुळे त्यांचा परिसरातील अनेक गावांमध्ये परिचय झाला. त्याचवेळी ते आष्टीच्या शेतकरी संघटनेचे अध्यक्ष झाले. नेमकेच त्यावेळी मतदार यादीतही त्यांचे नाव समाविष्ट झाले होते. शेतकरी संघटनेकडून त्यांनी निवडणूक लढवावी असा विचार कार्यकर्त्यात झाला आणि घरच्यांशी बोलून त्यांनी ती निवडणूक लढविली अन् ते दोन हजार मतांनी पराभूत झाले. परंतु परिसरात आपल्या मागे उभे राहणारे लोक भरपूर आहेत. याचा अंदाज त्यांना आला. त्यानंतर दोनच वर्षांनी पुन्हा निवडणुका झाल्या आणि ते १५ ते २० हजार मतांनी निवडून आले आणि मग राजकारणात रूळत गेले.

जलयुक्त शिवार ही अत्यंत चांगली योजना आहे. नदी - नाले सरळ करणे, रूंद करणे, खोलीकरण करणे यावर जास्त लक्ष दिले जावे असा धोंडे साहेबांचा नेहमीच आग्रह राहिलेला आहे. ज्या कामाला १५ लाख रूपये लागतात तो सिमेंट बंधारा धोंडे साहेबांनी त्यांच्या काळात केवळ सव्वालाखात बांधला होता. जलयुक्तमध्येही अशाच प्रकारे कमी निधी गुंतवून जास्त प्रमाणात फायदा कसा होईल हे पाहिले जात आहे. दुष्काळामुळे या मतदार संघाची परिस्थिती बिकट होत चालली आहे. मतदार संघातून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत आहे. आपल्या मतदार संघातील लोकांना गावातच रोजगार उपलब्ध व्हावा आणि त्यांनी घरदार सोडून जावू नये ही परिस्थिती निर्माण करण्याचे मोठे काम मला करायचे आहे. असे धोंडे साहेब सांगतात. सिना मेहकरीच्या मंजुरीसाठी काढलेला पायी मोर्चा आणि त्यामुळे मिळालेली मंजुरी, संरक्षण खात्याने या मतदार संघातील जमीन संपादन करण्याची प्रकिया सुरू केल्यानंतर आष्टी ते दिल्ली हा पायी मोर्चा काढून त्या प्रक्रियेला मिळविलेली स्थगिती. मतदार संघात ठिकठिकाणी बांधलेले पाझर तलाव आणि रस्ते आणि शिक्षणाच्या निर्माण केलेल्या सुविधा ही महत्वाची कामे मा. आ. श्री. भीमराव धोंडे साहेब यांनी केलेली आहेत. या मतदार संघाचा सर्वात महत्वाचा प्रश्न पाण्याचा आहे म्हणूनच सिना मेहकरी योजना पुर्ण करणे महत्वाचे आहे. असे मा. आ. श्री. भीमराव धोंडे साहेब सांगतात.

त्यांनी शिक्षकांसाठी पतसंस्था सुरू केली. अनेक शिक्षण संस्था आष्टी, पाटोदा, शिरुर तालुक्यात सुरू केलेल्या आहेत. या संस्थामध्ये संपुर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी आष्टीमध्ये येतात. आष्टी तालुका शिक्षण क्षेत्रात बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर असला पाहिजे याचे श्रेय फक्त मा. आ. श्री. भीमरावजी धोंडे साहेब यांनाच आहे.आष्टी विधानसभा मतदार संघाचे तालुक्याचे सलग पंधरा वर्ष आमदार राहीले व पुन्हा २०१४ मध्ये निवडून आले. त्यांनी १९८० ते १९९५ या कालावधीमध्ये मोठी विकासकामे केली. नंतरच्या निवडणुकीत त्यांना अपयश आले असले तरी त्यांनी सामाजिक कार्यामध्ये कसलाही बदल केला नाही. त्यांनी आमदार असतांना प्रत्येक गावाला जाण्यासाठी रस्ता, तलाव, नळ योजना, विजेची सोय, शाळा, मंदिरे आदी विकासाची कामे केलेली आहेत. आजही ते तितक्याच जिद्दीने व धाडसाने शेतकऱ्यांचे व सर्वसामान्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी उभे रहात आहेत.

आष्टी तालुक्याला कुकडीचे पाणी मिळावे म्हणून आष्टी ते मुंबई पायी मोर्चा तसेच शेतकऱ्यांसाठी आष्टी ते दिल्ली पायी मोर्चा काढला. मा. आ. श्री. भीमरावजी धोंडे साहेब यांना सलग तीन वेळा निवडणुकीमध्ये अपयश आले तरी, आजपर्यंतचा मागील इतिहास पाहिला तर राजकारणात धोंडे साहेब हे कायम चर्चेत राहून समाजसेवेचे व्रत त्यांनी सोडले नाही. त्याची पावती म्हणून मतदारांनी पुन्हा २०१४ साली विधानसभेवर पाठवले. पुन्हा त्यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघाच्या विकासाला चालना मिळालेली आहे. आष्टी मतदार संघ हा सातत्याने दुष्काळाच्या सावटाखाली आहे. २००१ पासून या मतदारसंघातील पाऊस ६० टक्याच्या पुढे गेलेला नाही. त्यामुळे नुसत्याच शेतीवर भागत नाही म्हणून स्थलांतर होत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढतात, त्यालाही कारण सिंचनाच्या अपुऱ्या सुविधा हेच आहे. त्यामुळे मतदार संघाला खात्रीशीर हक्काचे आणि कायमस्वरूपी पाणी आणणे हेच आपले ध्येय आहे आणि पुढचे राजकारण त्यासाठीच असल्याचे मा. आ. श्री. भीमराव धोंडे साहेब म्हणतात. पुर्वी सरकारचे बजेट कमी असायचे मात्र सरकारमध्ये आणि लोकप्रतिनिधींमध्ये संवेदनशिलता होती, एखादी घटना घडली किंवा एखादा प्रश्न उपस्थित केला गेला तर संपुर्ण सभागृह प्रतिसाद द्यायचे, त्यावर चर्चा व्हायच्या, मात्र दुर्दैवाने आता तितकीशी संवेदनशिलता राजकारणामध्ये राहिलेली नाही. असे मा. आ. श्री. धोंडे साहेब सांगतात.शेती हा महाराष्ट्राचा कणा आहे, मात्र शेतीकडे पहिल्यापासूनच सरकारने फारसे लक्ष दिलेले नाही. आजही त्या भागात सिंचनाच्या सुविधा नाहीत. १९८० पासून सोयी आणि सुविधा अपुऱ्या आहेत. आजपर्यंत खरे तर कृष्णा खोऱ्याचे पाणी आष्टी भागात यायला हवे होते. मात्र ते आलेले नाही आणि सिंचनाशिवाय प्रगती होत नाही हे वास्तव आहे. एकदा शेतकऱ्यांना खात्रीशिर पाणी मिळाले की तो प्रगती करू शकतो म्हणूनच सरकारने सिंचनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. असे धोंडे साहेबांना नेहमीच वाटते. शेतकरी उपाशी आहे, त्याच्या पोटाला अन्न आणि हाताला काम देणे हे महत्वाचे आहे. त्याला इतर गोष्टींचा काय उपयोग आणि यासाठी पाणी गरजेचे आहे. ज्या भागात पाणी आहे तेथे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत नाहीत. शेतकरी आत्महत्येकडे निव्वळ एक प्रकरण म्हणून पाहून चालणार नाही. एकेकाळी कधीतरी एखादी आत्महत्या झाली तर संपुर्ण सभागृह गंभीर व्हायचे आता राज्यात रोज चार आत्महत्या होत आहेत. शेतीसाठीची धोरणे बदलावी लागणार आहेत. असे धोंडे साहेबांचे मत आहे.

जर आरनाल्डो नावाचा नट वयाच्या ७५ व्या वर्षी हॉलीवूडमध्ये नायक म्हणून काम करू शकतो तर धोंडे साहेबांना काय अडचण आहे. मुळात लहानपणापासूनच धोंडे साहेबांवर व्यायामाचे संस्कार आहेत. ४ थीला असतांना त्यांची आई त्यांना सोडून गेली, मात्र आजोबा, वडिल, काका पहाटेच व्यायामाला न्यायचे. त्यांची मुलंही आजही व्यायाम करतात, खेळतात. या व्यायामाचा आणि खेळाचा एकंदरच परिणाम धोंडे साहेबांच्या शरीरावर झाला. तसेच त्यांनी ते सातत्य आजपर्यंत टिकदून ठेवलेले आहे. खेळ हा तर त्यांच्या आवडीच विषय आहे, जर धोंडे साहेब आजपर्यंत खेळत राहिलो असते तर प्रो कबड्डीमध्ये त्यांची किंमत कोटयावधीमध्ये झाली असती. महाविद्यालयीन जीवनापासून ते सातत्याने खेळत आलेले आहेत. कुस्ती, कबडी, अँथलेट आदी प्रकारामध्ये ते पुणे विद्यापीठाच्या संघात कायम असायचे. त्यामुळे वर्षातले तीन चार महिने ते पुण्यातच असायचे. खेळत असतांनाच विद्यालयीन जीवनातच १० टक्के भारत देश त्यांनी पाहिला आणि यातूनच एक खिलाडू वृत्ती त्यांनी आयुष्यात जोपासली, ज्याचा त्यांना आजही उपयोग होतो.

तसा राजकारण हा विषय त्यांचा नव्हता पण त्यांच्याबददल प्रत्येकाला आकर्षण असायचे. सत्तेत असतांना आणि नसतानांही ते जेथे कोठे जातात तेथे लोक जमतात. हे केवळ आजचे नाही तर महाविद्यालयीन जीवनातही तेच चित्र असायचे. ते कॉलेजला असतांना त्यांच्याभोवती विद्यार्थ्यांचा घोळका कायम असायचा. कबड्डी आणि कुस्तीमध्ये ते त्यावेळी सर्वपरिचीत होते. त्यानंतर कुस्ती आणि कबड्डीमुळे त्यांचा परिसरातील अनेक गावांमध्ये परिचय झाला. त्याचवेळी ते आष्टीच्या शेतकरी संघटनेचे अध्यक्ष झाले. नेमकेच त्यावेळी मतदार यादीतही त्यांचे नाव समाविष्ट झाले होते. शेतकरी संघटनेकडून त्यांनी निवडणूक लढवावी असा विचार कार्यकर्त्यात झाला आणि घरच्यांशी बोलून त्यांनी ती निवडणूक लढविली अन् ते दोन हजार मतांनी पराभूत झाले. परंतु परिसरात आपल्या मागे उभे राहणारे लोक भरपूर आहेत. याचा अंदाज त्यांना आला. त्यानंतर दोनच वर्षांनी पुन्हा निवडणुका झाल्या आणि ते १५ ते २० हजार मतांनी निवडून आले आणि मग राजकारणात रूळत गेले.

जलयुक्त शिवार ही अत्यंत चांगली योजना आहे. नदी - नाले सरळ करणे, रूंद करणे, खोलीकरण करणे यावर जास्त लक्ष दिले जावे असा धोंडे साहेबांचा नेहमीच आग्रह राहिलेला आहे. ज्या कामाला १५ लाख रूपये लागतात तो सिमेंट बंधारा धोंडे साहेबांनी त्यांच्या काळात केवळ सव्वालाखात बांधला होता. जलयुक्तमध्येही अशाच प्रकारे कमी निधी गुंतवून जास्त प्रमाणात फायदा कसा होईल हे पाहिले जात आहे. दुष्काळामुळे या मतदार संघाची परिस्थिती बिकट होत चालली आहे. मतदार संघातून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत आहे. आपल्या मतदार संघातील लोकांना गावातच रोजगार उपलब्ध व्हावा आणि त्यांनी घरदार सोडून जावू नये ही परिस्थिती निर्माण करण्याचे मोठे काम मला करायचे आहे. असे धोंडे साहेब सांगतात. सिना मेहकरीच्या मंजुरीसाठी काढलेला पायी मोर्चा आणि त्यामुळे मिळालेली मंजुरी, संरक्षण खात्याने या मतदार संघातील जमीन संपादन करण्याची प्रकिया सुरू केल्यानंतर आष्टी ते दिल्ली हा पायी मोर्चा काढून त्या प्रक्रियेला मिळविलेली स्थगिती. मतदार संघात ठिकठिकाणी बांधलेले पाझर तलाव आणि रस्ते आणि शिक्षणाच्या निर्माण केलेल्या सुविधा ही महत्वाची कामे मा. आ. श्री. भीमराव धोंडे साहेब यांनी केलेली आहेत. या मतदार संघाचा सर्वात महत्वाचा प्रश्न पाण्याचा आहे म्हणूनच सिना मेहकरी योजना पुर्ण करणे महत्वाचे आहे. असे मा. आ. श्री. भीमराव धोंडे साहेब सांगतात. अशा या अष्टपैलू व्यक्तीमत्वास वाढदिवसानिमित्त मनस्वी हार्दिक शुभेच्छा...!

# धनंजय मुंडे यांनी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून डोंगरतुकाई परिसरात सुरू असलेल्या कामांची केली पाहणी

याच ठिकाणी दत्त गुरूंच्या श्री नृसिंह सरस्वती अवताराचे शक्तिस्थळ

भाविकांच्या सोयीसह पौराणिक महत्त्व जपण्याच्या सूचना

परळी - परळी शहरात श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या माध्यमातून डोंगर तुकाई परिसरात सध्या सुरू असलेल्या आंबा आरोग्य भवानी मंदिर तसेच श्री नृसिंह सरस्वती शक्ती स्थळ येथील विविध विकास कामांची माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या समवेत पाहणी केली.



डोंगर तुकाई येथील श्री नृसिंह सरस्वती शक्ती स्थळ हे दत्तगुरूंचे अवतार असलेल्या नृसिंह सरस्वती यांच्या वास्तव्याने पुनीत झालेले असून त्याचा उल्लेख गुरुचरित्रात सुद्धा आढळतो. गुहे सारखे असणारे हे शक्ती स्थळ व त्यावरील अंबा आरोग्य भवानी मंदिर या ठिकाणी भाविकांची, साधकांची योग्य सुविधा व्हावी त्याच बरोबर या स्थळाचे पौराणिक महत्त्व अबाधित राखून, दर्जेदार पद्धतीने कामे पूर्ण केली जावीत, अशा सूचना श्री मुंडे यांनी यावेळी संबंधित अधिकारी यांना केल्या. त्याचबरोबर या कामासाठी निधीची अडचण भासू देणार नाही, असेही त्यांनी आश्वस्त केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, सुरेश अण्णा टाक, राजेंद्र सोनी, नितीन मामा कुलकर्णी, जालिंदर नाईकवाडे, शंकर कापसे, आर्किटेक्ट श्री बांगड, नगर अभियंता श्री बेंडले, जाफर खान, श्री ढवळे यांसह अधिकारी - पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# बीड येथील मानुरकर महाराज मठ येथे शिवदीक्षा संस्कार सोहळा संपन्न



मानूर/शाहेबाज पठाण ह्व

बीड येथील मानूरकर मठ येथे पवित्र श्रावणमास निमित्त दरवर्षी सदगुरु नागनाथ महाराज यांना संपूर्ण महिनाभर नित्य रुद्राभिषेक संपन्न केला जातो. याच कालावधीमध्ये श्री नागनाथ देवस्थान जहागिरदार मठसंस्थान मानूरचे मठाधिपती श्री ष.ब्र.१०८ गुरू विरुपाक्ष शिवाचार्य मानुरकर महाराज यांचा पाच दिवसीय अनुष्ठान सोहळा संपन्न होत असतो. यावर्षी दि.०२ ऑगस्ट ते ६ ऑगस्ट २०२५ या कालावधीत अनुष्ठान होत आहे. अनुष्ठाणात इष्टलिंग महापुजा,गुरुतिर्थ,गुरूपाद्यपूजन संपन्न होत आहे तसेच प्रतिवर्षी प्रमाणे श्रावण महिन्यातील दुसऱ्या सोमवारी भव्य शिवदीक्षा संस्कार सोहळा संपन्न झाला. या दिक्षा संस्कार सोहळ्यात १०१ शिवभक्तांनी गुरुवर्य मानुरकर महाराज यांची गुरुदिक्षा (अनुग्रह) घेतली व गुरुमंत्र ग्रहण केला. या शिवदीक्षा साठी धाराशिव, सं.नगर,परभणी, अहिल्यानगर, लातूर येथील शिष्यगण उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये सर्वांना संबोधित करताना गुरूवर्य म्हणाले की, आपल्या देहाचा उद्धार करण्यासाठी गुरु प्राप्ती करणे गरजेचे आहे. देव कोपला तर गुरु तारू शकतो, पण गुरुची अवकृपा झाली तर देव सुद्धा काहिच करू शकत नाही. सदगुरु पाठिशी असताना कुणालाही कसलीही भिती राहत नाही. प्रपंचामध्ये राहुन परमार्थ साधावयाचा असेल तर त्याला गुरूंचा अनुग्रह प्राप्त करूनच मोक्ष प्राप्त करता येतो. गुरूंनी दाखविलेल्या वाटेवर मनुष्याने मार्गस्थ झाल पाहिजे तरच मनुष्याला मोक्षाची प्राप्ती होईल. असे प्रतिपादन गुरुवर्य मानुरकर महाराज यांनी सर्व शिष्य सदभक्तांना केले. कार्यक्रमाची सांगता महामंगल आरती करून नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात

# श्रावण सोमवार निमित्त ना. पंकजाताई मुंडेंनी घेतले प्रभू वैद्यनाथाचे दर्शन

## बेलवाडीतील तपोनुष्ठानालाही दिली भेट

परळी /प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पंचम ज्योर्तिलिंग प्रभू वैद्यनाथाचे मनोभावे दर्शन घेतले.श्रावण महिन्यातील आज दुसरा सोमवार होता, यानिमित्ताने ना. पंकजाताई मुंडे यांनी दुपारी प्रभू वैद्यनाथ मंदिरात जाऊन विधीवत पूजा, अभिषेक करून दर्शन घेतले. मंदिरात आल्यानंतर देवल कमिटीच्या वतीने राजेश देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले.

तपोनुष्ठानाला भेट

शिरूर अनंतपाळ मठ संस्थानचे श्री शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांचे श्रावण मासानिमित्त वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्री २१ दिवसीय मौन तपोनुष्ठान सुरू आहे. बेलवाडीतील गुरूलिंग स्वामी मंदिरात जाऊन या तपोनुष्ठानला ना. पंकजाताईंनी भेट देऊन महाराजांचे आशीर्वाद घेतले. यावेळी वीरशैव समाजाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. भाजपच्या मंडळ शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, ज्येष्ठ नेते दत्ताप्पा इटके, सुरेखा मेनकुदळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



# श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये टाळ मृदंगाच्या गजरात बाळनाथ महाराज पालखी सोहळ्याला सुरुवात..!

बीड /प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महानसंत विभूती संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांच्या कृपा आशीर्वादाने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व गुरुवर्य तपोनिधी बाळनाथ महाराज पालखी सोहळ्याला सुरुवात झाली आहे. श्री ह भ प तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज तात्या बाळनाथ माऊली संस्थान यांच्या हस्ते कलश पूजन व दीप प्रज्वलन करून सप्ताह सुरुवात करण्यात आली. अनेक वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेनुसार श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये बाळनाथ महाराजांचा पालखी सोहळा आयोजित केला जातो. याही वर्षी बाळनाथ महाराजांच्या पालखी सोहळयाला टाळ मृदंगाच्या गजरामध्ये सुरुवात करण्यात आली. या पालखी सोहळ्यामध्ये आठ दिवस महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांचे हरीकीर्तन होणार आहेत. या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ गाथा भजन, ४ ते ५ ज्ञानेश्वरी प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० या वेळेमध्ये हरिकीर्तन, तसेच रात्री १० ते ३ या वेळेमध्ये संगीत भजन व जागराचे कार्यक्रम होणार आहेत. सर्व कार्यक्रम हे श्री ह भ प महादेव महाराज तात्या बाळनाथ माऊली संस्थान यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहेत. या अखंड हरिनाम सप्ताहाची व बाळनाथ महाराज पालखी सोहळ्याची समाप्ती ही बाळनाथ महाराजांच्या पालखी मिरवणुकीने आणि काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. ११ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी नऊ वाजता बाळनाथ महाराज यांच्या पालखी मिरवणुकीला सुरुवात होणार आहे. बाळनाथ महाराजांची पालखी ज्यावेळेस मंदिरामध्ये दाखल होईल त्यानंतर तपो निधी शांती ब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज तात्या श्रीक्षेत्र



# बीडमध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिर उत्साहात

## आ.संदीप क्षीरसागरांच्या हस्ते महसूल विभागाच्या विविध दाखल्यांचे वितरण



बीड (प्रतिनिधी):- बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे बीड तहसील कार्यालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीर उत्साहात पार पडले. यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी महसूल विभागाच्या वतीने देण्यात येणार्या विविध दाखल्यांचे, आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले.

बीड तहसील कार्यालयाच्या वतीने महसूल सप्ताहाच्या निमित्ताने सोमवारी (दि.४) रोजी बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास आ.संदीप क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांना रहिवाशी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे दाखले, रेशन कार्ड, जन्म-मृत्यू प्रामाणपत्र तसेच प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजना आदी योजनेच्या लाभार्थ्यांना मंजूरीपत्र व दाखल्यांचे वितरण आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसिलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह बीड तहसील कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी तसेच बीड तालुक्यातील महसूल विभागाच्या विविध योजनांचे लाभार्थी आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पिंपळनेर पोलिसांकडून गावठी पिस्तूलसह आरोपी अटक

बीड प्रतिनिधी

पिंपळनेर पोलिसांनी एका व्यक्तीकडून गावठी पिस्तूल जप्त करून त्याला अटक केली आहे. किशोर रामभाऊ माटे (वय ३७, रा. लोणी, ता. जि. बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

दि.०४.०८.२०२५ रोजी पिंपळनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, पिंपळनेर ते लोणी फाटा रस्त्यावर ओमकार हॉटेलसमोर एक व्यक्ती गावठी पिस्तूल घेऊन फिरत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सपोनि घुगे यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक गोलवाल, ग्रेपोउपनि शेळके, पोलीस नाईक बांगर, पोलीस शिपाई पठाण पो शी पिंपळे आणि पोलीस शिपाई सानप यांच्यासोबत दोन पंचांना घेऊन घटनास्थळी धाव घेतली.

हॉटेल ओमकारसमोर संशयित व्यक्ती उभा असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या कमरेला पाठीमागील बाजूस एक अर्धवट गंजलेले लोखंडी गावठी पिस्तूल आढळून आले. पोलिसांनी पिस्तुलाच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, आरोपीकडे कोणताही परवाना नसल्याचे समोर आले.

जप्त केलेल्या गावठी पिस्तूलाचे अंदाजित मूल्य ४०,०००/- रुपये आहे. पोलिसांनी दोन पंचांसमक्ष पंचनामा करून पिस्तूल जप्त केले आहे. आरोपीने बेकायदेशीररित्या गावठी पिस्तूल बाळगून लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ सह भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम २२३ आणि महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे, पोलीस उपनिरीक्षक गोलवाल, ग्रेपोउपनि शेळके, पोलीस नाईक बांगर, पोलीस शिपाई पठाण, पो शि पिंपळे आणि पोलीस शिपाई सानप यांनी केली आहे.

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बीड**
**सार्वजनिक न्यास नोंदणी**
**कार्यालय, बीड, प्रमप्रद्युम (नाहर) ब्रेल्डिंग,, औटी मंगल कार्यालयाजवळ, एस.बी.आय. समोर,**
**जालना रोड, बीड**
**चौकशीची जाहिर नोटीस**
एस. आर. एन. क्रमांक: BED/02680/18/25
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक - १०३७/२५

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक भोनाई देवीचे देऊळ वडगांव (क) ता.बीड जि. बीड बाबत

न्यासाचा पत्ता :- अट वडगाव का पोस्ट कलसांबार टीक्यू बीड डिस्ट्रिक्ट बीड, बीड, बीड, वडगाव (कळसांबर) अर्जदार गणेश आसाराम मोरे,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मुल्य |
|---|---|---|
| १ | TONE 1 | 2000.00 |
| २ | Statue Of Stone | 0.00 |

अ) जंगम मिळकत रोख रू.२०००/- मात्र
(अक्षरी रूपये दोन हजार रूपये मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस.किंवा महानगरपाकिा किंवा तहसील क्र. | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्यू |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Wadgaon (Kalsambar) | Khate No.10045/Gat No.277 | 5476 | 15000 | 12 x12 RCC Deal Construction And 15 x 20 Sambhanmandep | 150000.00 |

(ब) स्थावर मिळकतः- रोख रु. १५००००/- मात्र (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ३०-०७-२०२५ रोजी दिली

शिक्का

**आदेशावरुन,**
**क.लि.**
**दिवाणी न्यायालय,**
**व. स्तर, बीड**

**जाहीरनामा**
**मा. श्री. सय्यद डब्ल्यू. ए.**
**१० वे सह दिवाणी न्यायाधीश**
**व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ११९२ / २०२५**
**ॲड. अंरागे. प्रतीमा एन**
**अनिता चव्हाण वि निरक**
**अर्जदार -**
**१. अनिता भ्र. कल्याण चव्हाण वय - ४५ वर्ष धंदा - घरकाम**
**रा. बेलवाडी, ता.जि.बीड**
**२. पुजा पि. कल्याण चव्हाण वय- २८ वर्ष धंदा**
**रा. सदर धंदा-घरकाम**
**३. हरिभाउ पि कल्याण चव्हाण वय २३ वर्ष धंदा - शिक्षण**
**रा. सदर**
**विरूध्द**
**गैरअर्जदार :- निरंक**
**अर्जदार हे भारतीय आहेत**

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे कल्याण पि. सुखदेव चव्हाण यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे कल्याण पि. सुखदेव चव्हाण दिनाक २७/०६/२०२५ हे रोजी रा. लोटस मल्टीस्पेशॅलिटि हॉस्पीटल, बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्रं १. ही मयताची पत्नी आहे अर्जदार कं २ ही मयताची मुलगी आहे. अर्जदार कं ३ व ४ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हें मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्यांच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक २९/०८/२०२५

आज दिनांक २१/०७/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशावरुन,**
**क.लि.**
**दिवाणी न्यायालय,**
**व. स्तर, बीड**

# मंडळाधिकारी मंजुषा घुगे महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट मंडळ अधिकारी म्हणून दुसऱ्यांदा सन्मानित




अंबाजोगाई/प्रतिनिधी

अंबाजोगाई तहसील कार्यालया अंतर्गत असणाऱ्या घाटनांदुरसह इतरही गाव-खेड्यांच्या मंडळ अधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या मंडळ अधिकारी मंजुषा घुगे यांचा बीड जिल्हा महसूल प्रशासनाच्या वतीने महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट मंडळाधिकारी म्हणून दुसऱ्यांदा सन्मान करण्यात आला.

१ ऑगस्ट रोजी नुकत्याच पार पडलेल्या महसूल दिनानिमित्तच्या अनुषंगाने तलाठी म्हणून रुजू झालेल्या मंजुषा घुगे यांनी आपल्या एकंदरीत नौकरीच्या काळात कामाच्या नियोजनबद्ध पद्धतीमुळे आणि कार्यकुशलतेमुळे तलाठी म्हणूनही आणि पुढे मंडळाधिकारी झाल्यावरही महसूल प्रशासनात आपली एक वेगळी छाप पाडली. अल्पावधीतच त्यांचे काम पाहुन महसुल प्रशासनाने सन २०२३ मधे त्यांचा प्रथमतः उत्कृष्ट मंडळ अधिकारी म्हणून गौरव केला होता. या सन्मानाने सन्मानित झाल्यावर त्यांना कामाचा सन्मान हा केवळ जनमाणसात बहुमान वाढवतो असे नसुन तो येणाऱ्या काळात आपली पुर्वीपेक्षा जबाबदारीही वाढवतो. हे ओळखून सन्मानपुर्व काळातील कामकाजातील बारीकसारीक त्रुट्या दुर करत आपले काम आणखीनच चोख केल्याने एवढ्या कमी कालावधीत म्हणजेच केवळ दोनच वर्षांच्या अंतराने परत उत्कृष्ट मंडळ अधिकारी म्हणून त्यांना गौरविण्यात आले.

बीड जिल्हा महसूल प्रशासनातील अगदी कमी कालावधीत तब्बल दोन वेळा उत्कृष्ट मंडळ अधिकारी पुरस्काराने गौरविण्यात येणाऱ्या त्या एकमेव महिला मंडळाधिकारी असल्याने संपूर्ण जिल्ह्यात त्यांचे प्रशासकीय स्तरावर विशेष कौतुक होत आहे.

या गौरवाने आणि कौतुकाने निश्चितच माझी जबाबदारी जास्तच वाढली असून येणाऱ्या काळात अजुन जास्त वेगळ्या आणि वेगवान पध्दतीने काम करून सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या अडचणी कशा लवकरात लवकर सुटतील यासाठी माझा विशेष प्रयत्न राहील. एवढेच या पुरस्काराच्या अनुषंगाने सांगेन.अशी प्रतिक्रिया त्यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली.

**जाहीर प्रगटन**
**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १०/२०२५**
**राबियाबी खाजामियाँ पठाण -विरुध्द ग्रा.पं.**
**कार्या:- भवानवाडी**
**पहा - राबियाबी खाजामिया पठाण**
**रा.भवानवाडी ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक- **तब्बस्सुम खाजामियाँ पठाण यांचा जन्म १२/०२/१९९८** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **भवानवाडी** ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत औरंगपुर असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालय **भवानवाडी** ता.जि.बीड जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०७/०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०५/०८/२०२५ ही आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार, बीड.

**जाहीर प्रगटन**
**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ११/२०२५**
**राबियाबी खाजामियाँ पठाण -विरुध्द ग्रा.पं.**
**कार्या:- भवानवाडी**
**पहा - राबियाबी खाजामिया पठाण**
**रा.भवानवाडी ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक- **तरन्नुम खाजामियाँ पठाण यांचा जन्म १३/०९/१९९९** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **भवानवाडी** ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत औरंगपुर असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालय **भवानवाडी** ता.जि.बीड जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०४/०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०५/०८/२०२५ ही आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार, बीड.

**जाहीर प्रगटन**
**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २५/२०२५**
**शेख रफीक चाँद -विरुध्द ग्रा.पं.**
**कार्या:- भाटसांगवी / औरंगपुर**
**पहा - शेख रफीक चाँद,**
**रा. औरंगपुर ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक- **शेख जिया रफीक यांचा जन्म ०२/१०/२०१४** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **भाटसांगवी/औरंगपुर** ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत औरंगपुर असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालय **भाटसांगवी/औरंगपुर** ता.जि.बीड जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०४/०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख / /२०२५ ही आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार, बीड.

**जाहीर प्रगटन**
**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १०/२०२५**
**राबियाबी खाजामियाँ पठाण -विरुध्द ग्रा.पं.**
**कार्या:- भवानवाडी**
**पहा - राबियाबी खाजामिया पठाण**
**रा.भवानवाडी ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक- **सादिया खाजामियाँ पठाण यांचा जन्म १४/०९/२००३** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहुण अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास **भवानवाडी** ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत औरंगपुर असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालय **भवानवाडी** ता.जि.बीड जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/०७/०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २९/०८/२०२५ ही आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार, बीड.




## जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या बांधकामास उच्च न्यायालयाची मंजुरी

केज/प्रतिनिधी

केज येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचे बांधकाम करण्यास मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी मंजुरी दिली असून, सदर बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता प्रक्रियेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड यांच्या आदेशानुसार बांधकाम विभागाकडून पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तावित इमारतीत पुढील सुविधांचा समावेश असणे आवश्यक आहे. तृतीयपंथीय व्यक्तींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह असणे आवश्यक आहे तसेच

दिव्यांग,महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी न्यायालयीन इमारतीत प्रवेशयोग्य पायाभूत सुविधा असल्या पाहिजेत.सदर प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाचे पत्र दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ व दिनांक २१ डिसेंबर २०२४ नुसार तयार करण्यात आला आहे.प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंबाजोगाई कार्यालया मार्फत तांत्रिक मान्यते साठी आवश्यक बाबींचा समावेश करून अंतिम अंदाजपत्रक तयार करण्यात येणार आहे.या निर्णयामुळे केज तालुक्यातील न्यायिक कामकाज अधिक सुसज्ज आणि सर्वसमावेशक पद्धतीने पार पाडले जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.केज वकील संघाचे अध्यक्ष अड. एम.एस.लाड यांच्या सह वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी याची मागणी केली होती त्यांच्या मागणीची दखल घेऊन मा.उच्च न्यायालयाने मंजुरी दिली आहे याबद्दल केज वकील संघाच्या वतीने मा.उच्च न्यायालयाचे आभार मानले आहेत.

# हरित महाराष्ट्र,समृद्ध महाराष्ट्र अभियानांचा पालकमंत्री अजितदादांच्या शुभहस्ते शुभारंभ !

## वर्षभरात १ कोटी वृक्ष लागवड करून बीड हरितमय करण्यासाठी जनतेने उस्फूर्त साथ द्यावी - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## गोपीनाथराव मुंडे महामंडळांतर्गत ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी महामेळावा

बीड /प्रतिनिधी

हरित महाराष्ट्र,समृद्ध महाराष्ट्र अभियानांचा शुभारंभ महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते ७ ऑगस्ट २०२५ रोजी बीडचे श्रद्धास्थान श्री खंडेश्वरी माता देवस्थान परिसरामध्ये वृक्ष लागवडीने होणार आहे. एकाच दिवशी दहा लक्ष झाडांचे वृक्षारोपण करण्यात येणार असून येणाऱ्या वर्षभरामध्ये बीड जिल्ह्यात एक कोटी वृक्ष लागवड करून बीड हरितमय करण्यात येणार आहे.यासाठी बीड जिल्ह्यातील जनतेने उस्फूर्तपणे साथ द्यावी असे आवाहन पत्रकार परिषदेमध्ये बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले. त्याच बरोबर सर्व ऊसतोड कामगारांची शंभर टक्के नोंदणी करून त्यांना गोपीनाथराव मुंडे कामगार महामंडळ अंतर्गत सर्व शासकीय सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून या अनुषंगाने महा शिबिराचे आयोजन देखील पालकमंत्र्यांच्या उपस्थित होणार असल्याचे स्पष्ट केले.

बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात ४ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये अधिक माहिती देताना बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की,हरित महाराष्ट्र,समृद्ध महाराष्ट्र



अभियानांचा शुभारंभ महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत खंडेश्वरी मैदान बीड येथे होणार आहे, एकाच दिवशी जिल्हाभरात ३० लक्ष वृक्ष लागवडीचा संकल्प केला आहे. वर्षभरात एक कोटी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे.यामध्ये वन विभाग दहा लाख, सामाजिक वनीकरण पाच लाख, जिल्हा परिषद पाच लाख, तुती लागवड तीन लाख, कृषी दोन लाख, नगर पालिका दीड लाख, वन्यजीव ७५ हजार, पोलिस ५० हजार, इको बटालियन ५० हजार व इतर यंत्रणा, स्वयंसेवी संस्था एक लाख ७५ हजार रोपांची असे एकूण ३० लाख रोपे लावणार आहेत. प्रामुख्याने स्थानिक प्रजातीचे वड, पिंपळ, कडुनिंब, आंबा, सिसू, करंज, शेवगा, जास्वंद आदी प्रकारच्या रोपांचा समावेश असेल.क्यू आर कोड, जिओ टॅगिंग, वन विभागाकडून ड्रोनच्या साहाय्याने छायाचित्रण करण्यात येणार आहे.यासाठी १२ हजारांहून अधिक प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीमध्ये ऊसतोड कामगार मेळावा देखील घेण्यात येणार आहे. या अंतर्गत गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे या महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनेच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन पालकमंत्र्यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. तर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत मेळाव्यात कामगार महिलांसाठी प्रथमोपचार संच पेटीचे वाटप करण्यात येणार आहे.ऊसतोड कामगारांसाठी आरोग्य विभागामार्फत आरोग्यसाथी उपक्रम सुरू करून त्याअंतर्गत एक हजार महिलांची आरोग्य साथी म्हणून निवड करण्यात येईल. त्यांना आरोग्य संस्था बीड येथे प्रशिक्षण देणे व माहिती पुस्तिका, प्रथमोपचार संच पुरविणे व त्यांच्या हाताळणी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.ऊसतोड कामगारांना प्रत्यक्ष स्थलांतरा दरम्यान येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी टोल फ्री क्रमांक नव्याने सुरू केला जाणार आहे.बीड जिल्ह्यातील सर्व कामगारांची १०० टक्के नोंदणी करून ग्रामपंचायत स्तरावर ओळखपत्र वितरीत देखील करण्यात येणार आहेत. ऊसतोड कामगारांना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी याचा फायदा होणार आहे.नोंदणी झालेल्या सर्व ऊसतोड कामगारांना आयुष्यमान कार्ड, रेशन कार्ड, घरकुल योजना, ई-महसूल विभाग, ग्रामविकास विभाग व इतर विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सर्व शासकीय योजनांचा लाभ सॅच्युरेशन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

# श्रावण सोमवार निमित्ताने प्रभू वैद्यनाथाला भाविकांची मोठी गर्दी

परळी / प्रतिनिधी

पवित्र श्रावणमास सुरु असुन या श्रावण महिन्यातील दुसरा श्रावण सोमवार रोजी परळी वैजनाथ येथे राज्यभरातून गर्दी वाढली असल्याचे दिसून आले. शिवभक्तांच्या काल रविवार सुट्टीचा दिवस व आज श्रावणातील सोमवार असल्याने या दोन दिवसांत ज्योतिर्लिंग वैद्यनाथ दर्शनाला रांगा लागल्याचे दिसून आले.




बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग असलेल्या परळी वैजनाथ येथे सध्या श्रावण पर्वकाळ सुरू आहे. दर श्रावण सोमवारी भाविकांची दर्शनाला गर्दी होत आहे. त्याच अनुषंगाने आज दुसरा श्रावण सोमवारी लाखोच्या संख्येत शिवभक्तांनी वैद्यनाथाचे दर्शन घेतले. काल रविवारी मध्यरात्रीपासूनच दर्शनाला रांगा लागल्या होत्या.परराज्यातून व राज्यभरातून बाहेर गावाहून येणाऱ्या भाविकांनीही ज्योतिर्लिंग दर्शनाची पर्वणी साधली. त्यामुळे भाविकांची परळीत मोठी गर्दी झाली होती.

परळी वैजनाथ येथे प्रभु वैद्यनाथाच्या दर्शनासाठी पहिल्या सोमवारपासूनच मोठी गर्दी होताना दिसत आहे. आज श्रावणी सोमवारी वाढलेली भाविकांची संख्या लक्षात घेता मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेल्याचे दिसून आले. वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टच्यावतीने सोमवारचे विशेष महत्त्व लक्षात घेऊन भाविकांच्या दर्शनाची विशेष व्यवस्था केली होती. नेहमीप्रमाणेच पुरुष व स्त्रियांसाठीच्या स्वतंत्र रांगा व पासधारकांची स्वतंत्र रांग अशा पद्धतीने शिवभक्तांनी वैद्यनाथाचे दर्शन घेतले.

श्रावण सोमवारच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात पोलिसांनी चोख बंदोबस्त लावला होता. दर सोमवार प्रमाणेच नाथ प्रतिष्ठानच्या वतीने परळीत दाखल होणाऱ्या भाविकांसाठी साबुदाणा खिचडी, राजगिरा लाडू व फळांचे वाटप करण्यात आले. दुपारनंतर भाविकांची संख्या वाढल्याचे दिसून आले. शिवभक्तांनी प्रभु वैद्यनाथाचा जयघोष करत दुसऱ्या श्रावण सोमवारच्या दर्शनाची पर्वणी साधली.

मुंडे बंधू-भगिनी यांनी घेतलं प्रभु वैद्यनाथ दर्शन

श्रावण महिन्यातील दुसऱ्या सोमवारी परळीतील प्रभू श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी लाखो भाविकांनी गर्दी केली. त्या भक्तिरसात एक उल्लेखनीय क्षण ठरला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे आणि माजी कृषी मंत्री व आमदार धनंजय मुंडे या बहिण-भावाने एकत्र येत प्रभू श्री वैद्यनाथाचे दर्शन घेतले. दर्शनानंतर दोघेही वैद्यनाथ मंदिर कार्यालयात गेले. यावेळी त्यांनी देवस्थान ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करत परळी शहरातील तीर्थक्षेत्र विकास योजना व इतर प्रलंबित कामांचा आढावा घेतला. या चर्चेत देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष व्यंकटेश मुंडे, सचिव प्रा. बाबासाहेब देशमुख व विश्वस्त राजेश देशमुख उपस्थित होते. त्याआधी माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांनीही मंदिरात जाऊन दर्शन घेतले.








बीड - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या व प्रवक्त्या सुषमाताई अंधारे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आल्या असता शिवसेनेचे बीड जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांच्या निवासस्थानी भेट दिली.यावेळी शिवसेना व धांडे परिवाराच्या वतीने ताईंचा आदरपूर्वक सत्कार करण्यात आला.यावेळी शिवसेना व धांडे परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.







हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅंक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).